प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

दि. २५.०१.२०२१

**हज हाउस आणि हंगामी कार्यालय उभारणीसाठी खारघर येथील भूखंड हज समितीला देण्याचा सिडकोचा निर्णय**

सिडकोतर्फे नवी मुंबईतील खारघर येथील सेक्टर-३८ मधील भूखंड क्र. १ए भारतीय हज समितीला हज हाउस आणि हंगामी कार्यालयाच्या उभारणीसाठी वाटपित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापासून नजीकच्या अंतरावर हा भूखंड असल्याने हज यात्रेला जाणाऱ्या यात्रेकरूंना याचा निश्चितच फायदा होणार आहे.

मुस्लीम धर्मियांसाठी महत्त्वाच्या असणाऱ्या हज यात्रेसाठी जगभरातील लक्षावधी मुस्लीम बांधव सौदी अरेबियातील मक्का आणि मदिना शहरांना भेट देण्यासाठी जातात. १९२७ पासून भारतातील हज यात्रेकरूंसाठी या यात्रेची व्यवस्था करण्यासह तत्संबंधी इतर प्रश्नांची सोडवणूक करण्याचे काम भारतीय हज समिती करत असून सदर समिती ही भारतीय संसदेने केलेल्या अधिनियमांतर्गत स्थापन झालेली वैधानिक संस्था आहे. भारतातील हज यात्रेकरूंसाठी आवश्यक ती व्यवस्था करण्यासह राज्यांतील/केंद्रशासित प्रदेशांतील हज समित्यांबरोबर समन्वय साधण्याचे अधिकार भारतीय हज समितीला आहेत. सन २०१६ पासून हज यात्रेसंबंधीचे कामकाज भारत सरकारच्या अल्पसंख्याक मंत्रालयाकडे सोपविण्यात आले आहे. अल्पसंख्याक मंत्रालयाकडून भारतीय हज समितीच्या हज हाउस तसेच हंगामी कार्यालयाच्या उभारण्यासाठी शक्यतो नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळील भूखंड देण्यात यावा याबाबतची विनंती करणारे पत्र सिडकोला प्राप्त झाले होते. त्या अनुषंगाने सिडकोकडून नवी मुंबईतील खारघर येथील सेक्टर-३८ मधील ६,००० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड क्र. १ए भारतीय हज समितीला भाडेपट्ट्याने रु. १४,२१,९४,०००/- भाडेपट्टा अधिमूल्य आकारून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

---

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क अधिकारी, सिडको**